महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☎- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☎ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 322 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 20 / 08 / 2025

# प्रेसनोट

## ''राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, नांदेड यांच्याकडून ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालयात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन''

**आज दिनांक 20 08.2025 रोजी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (NSS) ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (फिल्ड ऑपरेशन्स डिव्हिजन), उप-क्षेत्रीय कार्यालय, नांदेड यांच्या वतीने पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड च्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**

**सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा.श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विश्वसनीय सांख्यिकी माहितीच्या माध्यमातून पुराव्यावर आधारित धोरण निर्मितीमध्ये NSO च्या योगदानाचे कौतुक केले. तसेच सांख्यिकी उपक्रमांना पर्यावरणीय आणि शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जोडण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.**

**पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी तसेच पर्यावरणीय शाश्वततेबाबतच्या आपल्या बांधिलकीचा एक भाग म्हणून, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने आपल्या क्षेत्रीय कामकाजात पर्यावरणपूरक उपक्रम समाविष्ट करण्याचा संकल्प केला आहे. या वृक्षारोपण उपक्रमाद्वारे, केवळ दर्जेदार माहिती संकलनापुरतेच मर्यादित नव्हे तर पर्यावरण रक्षणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे.**

**कार्यक्रमाचा समारोप श्री. शरद शिंदे, सहाय्यक निदेशक, उप-क्षेत्रीय कार्यालय, नांदेड यांच्या आभार प्रदर्शनाने झाले. त्यांनी जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याबद्दल आभार मानले आणि एका अधिक हरित व जाणीवपूर्वक भारतासाठी NSO च्या दृष्टीकोनावर प्रकाश टाकला.**

**सदर कार्यक्रमाला राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे श्री. शांतनू प्रमाणिक, व. सां.अधिकारी, विजय डांगे, हेम्मंत चर्लेवार तसेच उप-क्षेत्रीय कार्यालय, नांदेड येथील इतर अधिकारी, कर्मचारी व पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड**